जा.क्र.प्रा./प्राशि/खाप्राशा/मान्यता/पुवि/ २०/ २००३ (हस्तलिखित: १२५८०/०२)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 26 JUN 2003

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,
२. प्रशासन अधिकारी, शिक्षण प्रमुख
मनपा/नपा., प्राथमिक शिक्षण मंडळ, पुणे-५.

विषय : सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी घेण्याबाबत, माध्यम - इंग्रजी

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील शासन पत्र क्रमांक पीएलसम- १००२/(११८०/२००२)/प्राशि-३, दिनांक १०.६.२००३

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या माध्यमातून सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी घेण्याचे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | माध्यम |
|---|---|---|---|
| १. | रेवाबेन नागीनदास मेहता फाउंडेशन १२ रेवा लोकेश ए बिबवेवाडी, पुणे-४११०३७. | ब्ल्यू हेवन्स स्कूल, कात्रज, पुणे. | इंग्रजी |

त्यामुळे या संस्थांकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह १५ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करावा.

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधीत संस्थांना परवानगी देणे/न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

१. संबधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधीत संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमुन्यात सुधारीत शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नाव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच मान्यता प्रदान करावी.
११. सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधीत संस्था उघडणार नाही, असे संबधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु.२०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम पाळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबधित शाळा उघडणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१३. संस्थेस ज्या वर्षी शाळेस परवानगी घ्यावयाची आहे. त्याचवर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षीच्या शाळा नुतनीकरणासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षातच अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.
१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना-अनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही हे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या साक्षांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करुन ठेवाव्यात.
१५. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी. (उदा. नाव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता)

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१

प्रत माहितीस्तव सविनय सादर
मा. अवर सचिव,शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
१. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, ... राज्य, पुणे
प्रति, सचिव/अध्यक्ष, संबंधित संस्था रेवाबेन नागीनदास मेहता फाउंडेशन १२ रेवा लोकेश ए बिबवेवाडी, पुणे-३७

Joshi/...

परवानगी वर्ष :-२०१९-२०
माध्यम : इंग्रजी
**स्वंयअर्थ सहाय्यित शाळा**
(माध्यमिक)

जा.क.शिउसं/माध्य-३०३/प्र.मा.दर्जावाढ/पुवि/२०१९ 16698
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : - 24 OCT 2019

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

**विषय : सन २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान नविन शाळे साठी जून-२०१९ पासून इ. ९ वी व इ. १० वी इंग्रजी माध्यम चे वर्गास प्रथम मान्यता देण्याबाबत.**
**रेवाबेन नागिनदास मेहता फाउडेशन संचलित ब्लु हेवन्स सेकंडरी स्कुल महादेवनगर, शेलारमळा, कात्रज पुणे**

**संदर्भ :-** १) शालेय शिक्षण विभाग, मुंबई कडील शासन निर्णय क्रमांक नाहप्र-२००९/(६६३/०९) माशि-१, दिनांक २०.६.२०१२
२) शालेय शिक्षण विभाग,मुंबई कडील शासान निर्णय क्रमांक एसएफएस-१०१८/प्र.क्र. १५६९/एस.एम.-२ दिनांक ६.३.२०१९
३) या कार्यालयाचे पत्र क्रं.शिउसं /प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१८-१९/३७ दिनांक २०.०९.२०१९
४) आपले कार्यालयाचे पत्र जा.क्र.जि.प/ शिक्षण /माध्य/४६७३/ २०१९ दिनांक ०१.१०.२०१९

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२ व ३.३ अन्वये **रेवाबेन नागिनदास मेहता फाउडेशन संचलित ब्लु हेवन्स सेकंडरी स्कुल महादेवनगर,** या इंग्रजी माध्यम माध्यमिक शाळेस संदर्भीय क्र. २ चे शासन निर्णयानुसार स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून राज्यमंडळ उच्च प्राथमिकला जोडून माध्यमिक, इ. ९ वी ते १० वी इंग्रजी माध्यम दर्जावाढ करिता देण्यात आलेली होती. तदनंतर या कार्यालयाने संदर्भीय पत्र क्रमांक ३ अन्वये माध्यमिक दर्जावाढ शाळा उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक इ. ९ वी ते १० वी इंग्रजी माध्यम राज्यमंडळ करिता सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून दर्जावाढ स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील शाळेस परवानगी दिलेली आहे.

आता आपल्या संदर्भीय क्रमांक ४ व्दारे आपण दिलेली स्वयंस्पष्ट शिफारस विचारात **घेता उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक इ. ९ वी व इ. १० वी चे वर्गास सन २०१९-२०२० पासून इंग्रजी माध्यम राज्यमंडळ दर्जावाढ शाळा स्वयंअर्थसहाय्यित तत्वाकरिता प्रथम मान्यता** देण्यात येत आहे.

१.प्रस्तुत प्रकरणी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ मधील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.
२.नविन वर्गांना कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
३.माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे.
४.विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.
५.संच निश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.
६.शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.
७.विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.
८.शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.
९.सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.
१०.संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
११.शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
१२.अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष **२०१-२०** पासून असेल
१३.शैक्षणिक वर्ष **२०१-२० मध्ये** ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत
१४.परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा यांना शासनाच्या वेळावेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे ,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वंय अथसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) मुख्य - अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
१५ शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता **स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र इंग्रजी माध्यम नवीन माध्यमिक शाळा / वर्ग असे** दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील

१६.महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळा भविष्यात ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

१७.महाराष्ट्र स्वंयअथसहय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या नियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **U-Dise** मध्ये माहिती भरताना स्वंय अर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

१८.शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

**इतर अटी :**

जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी

१.शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे यांची राहील.

५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

**६. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकष,शर्ती,अटी यांच्या पूर्ततेसह शाळेस इमारत व भौतिक सुधारणा करणे बंधनकारक राहील.**

**७. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम २००९ व नियम २०१६ चे पालन करणे बंधनकारक आहे.**

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीचे व वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा शर्तींची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा.

(प्रविण अहिरे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१.

**प्रत : माहितीसाठी सविनय सादर**

१.मा.अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

१. **मुख्याध्यापक, ब्लु हेवन्स सेकंडरी स्कुल कात्रज पुणे**

२. विभागीय सचिव,पुणे विभागीय शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे.

३. अध्यक्ष/सचिव, **रेवाबेन नागिनदास मेहता फाउडेशन कात्रज पुणे**

४. निवडनस्ती कार्यासन माध्य-३०२

Scanned with CamScanner